दूरध्वनी २५३३१२११
२५३३१५९०

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पांचपाखाडी ठाणे ४०० ६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

संदर्भ क्र. ठामपा/आयुक्त/ ४४६ दिनांक : १६ / ०१ /२०२१

## - आदेश -

**विषय : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या सर्व शाळा व सर्व विद्यालये बंद ठेवण्याबाबत.**

**संदर्भ** : १. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एएसडी-६ दि.१५ जून, २०२०
२. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.८६/एएसडी-६ दि.२४ जून, २०२०
३. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण.२०२०/प्र.क्र./१४०/एएसडी-६, दि. १० नोव्हेंबर, २०२०
४. ठाणे महानगरपालिका परिपत्रक क्र. ठामपा/कोविड-१९/साप्रवि/१८४८ दि.२०/११/२०२०
५. ठाणे महानगरपालिका आदेश क्र. ठामपा/कोविड-१९/साप्रवि/आयुक्त/२७२/२०२० दि.३१/१२/२०२०

ज्याअर्थी शासनाच्या उपरोक्त संदर्भिय क्र. १ च्या परिपत्रकानुसार राज्यात कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत राज्यातील शाळा प्रत्यक्षात सुरु करणे शक्य नसल्यामुळे दि. १५ जून, २०२० पासुन शैक्षणिक वर्ष सुरु करुन स्थानिक परिस्थितीनुसार प्रत्यक्ष शाळा टप्प्याटप्प्याने सुरु करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांचे सहाय्याने संबंधित शाळा व्यवस्थापन समिती यांना प्रदान करण्यात आले आहेत, आणि

ज्याअर्थी शाळांतील शिक्षकांच्या उपस्थितीबाबत शासनाने यापूर्वी पारित केलेल्या परिपत्रकानुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबु नये यासाठी संदर्भ क्र.२ परिपत्रकान्वये पूर्व प्राथमिक ते इयत्ता १२ वी पर्यत ऑनलाईन शिक्षणाचा कालावधी व शिक्षणाच्या स्वरुपाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या, आणि

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात कोरोनाचा प्रादुर्भाव नियंत्रणात असला तरीही अन्य देशांमध्ये कोरोना विषाणूची आलेली दुसरी लाट व अन्य राज्यातील कोरोनाची परिस्थिती विचारात घेता खबरदारीचा उपाय म्हणून ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या सर्व शाळा व सर्व विद्यालये संदर्भ क्र. ४ परिपत्रकान्वये दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता व ही मुदत संदर्भ क्र. ५ आदेशान्वये १६ जानेवारीपर्यंत वाढविण्यात आली होती, आणि आतासुध्दा खबरदारीचा उपाय म्हणून सर्व शाळा व सर्व विद्यालये बंद ठेवणे आवश्यक असल्याबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव नियंत्रणात असला तरी, कोरोनाची दुसरी लाट विचारात घेता, ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या सर्व शाळा व सर्व विद्यालये विद्यार्थ्यांसाठी दि. १६ जानेवारी, २०२१ पासून या कार्यालयाचे पुढील आदेशापर्यत बंद ठेवण्याचे निर्देश सर्व शाळा व विद्यालये यांना देण्यात येत आहेत.

उक्त आदेशाची सर्व संबंधितांनी तात्काळ अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलजबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम १८८ नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

विजयकुमार म्हसाळ
उपआयुक्त (मुख्यालय)
ठाणे महानगरपालिका, ठाणे

(मा. आयुक्त यांचे मान्यतेने)

**प्रत** : १) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
२) मा. पालकमंत्री ठाणे तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
३) मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी
४) मा. विभागीय आयुक्त, कोकण
५) मा. पोलिस आयुक्त, ठाणे
६) जिल्हाधिकारी ठाणे .
७) पोलिस अधिक्षक ठाणे (ग्रामीण)
८) मा. महापौर, मा. उप महापौर, मा. सभापती - स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते
९) स्विय सहाय्यक, आयुक्त व अतिरिक्त आयुक्त - १ व २ यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
१०) उपआयुक्त (मुख्यालय), सर्व उपआयुक्त - परिमंडळ यांजकडे माहितीसाठी,
११) सर्व सहाय्यक आयुक्त / सर्व विभागप्रमुख, समन्वय अधिकारी - नागरी सुविधा केंद्र,
१२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महापालिका प्राथमिक व माध्यमिक आणि सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या खाजगी अनुदानीत व विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळा
१३) मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी